# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायंकाळ)

जा.क्र. ३९०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—०६/०७/२०१६.

**१) मोटार सायकलच्या धडकेत सायकलस्वार जखमी होवुन सायकलचे नुकसान. :—**

दिनांक ०२/०७/०१६ रोजी ११.०० वा. दरम्यान फिर्यादी किशोर धनपाल कावळे वय ३० वर्ष, रा. गुंजेपार यांचा पुतण्या वैभव तुकाराम कावळे वय १३ वर्ष रा. गुंजेपार हा मांढळ ते गुंजेपार सायकलने घरी परत येत असतांना विरुध्द दिशेने येणा—या आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ४० डी ७९९० च्या चालकाने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन वैभव तुकाराम कावळे याच्या सायकलला मांढळ ते गुंजेपार शेत शिवार येथे धडक मारून जखमी करुन सायकलचे नुकसान केले. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,३३७,४२७ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलच्या धडकेत वृध्द इसम जखमी. :—**

दिनांक ०५/०७/०१६ रोजी ११.१५ वा. दरम्यान आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ३६ जे ९४५६ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील मो.सा. हयगयीने व लापरवाहीने चालवुन रामलाल महालगावे वय ६० वर्ष रा. मोहाडी हे पायदळ जात असतांना त्यांना तहसिल कार्यालय मोहाडी समोर धडक मारुन जखमी केले व स्वत:ही जखमी होण्यास कारणीभुत झाला. असे सर तर्फे फिर्यादी पोना. गोमासे पो.स्टे. मोहाडी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३३७ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गेडाम पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**३) महिलेला अश्लिल व जातीवाचक शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली. :—**

दिनांक ०२/०७/०१६ रोजी ०९.३० वा. दरम्यान फिर्यादी विवाहित महिला वय ४५ वर्ष यांच्या घरासमोर रोडचे बाजुला सार्वजनीक ठिकाणी ठेवलेल्या काळया दोन्ही आरोपीतांनी फेकल्याने त्यांना फिर्यादिने हटकले यावरून आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादि सोबत तोंडातोंडी भांडण करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ व जातीवाचक शिवीगाळ केली व जिवाने मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३(१)(१०) अ.जा.ज.अ.प्र.का. १९८९ सहकलम २९४,५०६,५०४,३२३,३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सांगळे, पवनी विभाग हे करीत आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.